# OIL & NATURAL GAS COMMISSION (B.O.P.) KARMACHARI SANGHATANA

Reg. No. (By - II - 8268)

**Tel.:** 2659 9775 / 2656 2448

Acme Harmony, 1/102, Poonam Nagar, Opp. ONGC Colony, Jogeshwari (E), Mumbai - 102.


REF. : ONGC/KS/ /2012

DATE : 24-1-2012

## पी आर पी (खुष खबर)

दिनांक 20.10.2012 रोजी एनएसई, मुंबई येथे सर्व मान्यताप्राप्त युनियनचे सरचिटणीस व व्यवस्थापन हयांच्यात बैठक झाली. व्यवस्थापनातर्फे श्री सुंदरलाल, मुख्य ई. आर, श्री तौकीर हुसेन, मुख्य एचआरडी हे उपस्थित होते. या बैठकीत सविस्तरपणे पीआरपीवर चर्चा झाली. मागील दिलेल्या पीआरपीच्या टक्केवारीप्रमाणे यावेळीही पीआरपी देण्यात येणार आहे. बाकी सर्व अटी अधिकारी वर्गाप्रमाणे असतील. 2009/2010/2011 हया वर्षात ओएनजीसी चा नफा जास्त असल्यामुळे यावेळी पीआरपी मध्ये जास्त रक्कम मिळणार आहे. पीआरपी ची ही रक्कम जानेवारीच्या पगारात मिळावी म्हणुन **ओएनजीसी (बीओपी) कर्मचारी संघटना** फारच आग्रही राहीली.

पीआरपी ची रक्कम आपल्याला जानेवरीच्या पगारात मिळेल. फक्त पीआरपी च्या संदर्भात ईसी मिटींग व बोर्ड मिटींग मध्ये मान्यता मिळणे आवश्यक आहे त्यामुळे जानेवारी महिन्याचा पगार 2 ते 4 दिवस उशीरा होण्याची शक्यता आहे. कारण पीआरपी ची रक्कम पगारात न देता त्यानंतर देण्यात आली तर इन्कम टॅक्स कट होऊ शकत नाही आणि इन्कम टॅक्स पगारात कट न झाल्यास फेब्रुवारी आणि मार्च महिन्याच्या पगारामध्ये इन्कमटॅक्स भरावा लागल्यास कर्मचा-यांना फेब्रुवारी व मार्च महीन्याचा पगार मिळणे मुश्कील होईल. म्हणुन पीआरपी ची रक्कम इन्कम टॅक्स कट करुन जानेवारीच्या पगारात देण्याचे ठरले आहे.

हया बैठकीत पीआरबीएस च्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. व्यवस्थापनाने पेन्शनमध्ये चांगला सकारात्मक बदल घडवून सर्व सरचिटणीसांना नवीन योजना सादर केली. हयावर आणखीही चर्चा होईल आणि कर्मचा-यांना निवृत्तीनंतर चांगली पेन्शन देण्यासाठी कर्मचारी संघटना प्रयत्नशील राहील.

उरण प्लॅन्ट मधील कर्मचा-यांना पे-रीवीजनचे ॲरीयर्स देताना ओव्हरटाईम मध्ये अंडरग्राऊंड मायनींग अलाऊन्स विचारात घेतला नव्हता. हया बैठकीमध्ये कर्मचारी संघटनेने जोरदार पाठपुरावा केल्यामुळे हयांची थकबाकी सुध्दा जानेवारी किंवा फेब्रुवारीच्या पगारात देण्यात येणार आहे.

01.01.1997 चा इश्यु. इ. सी. मिटींग च्या अजेंडामध्ये घेण्यात आलेला आहे. परंतु 3 जानेवारी व 13 जानेवारी या दिवशीच्या इ. सी. मिटींग काही कारणास्तव न झाल्यामुळे पुढच्या इ.सी. मिटींगमध्ये हा इश्यु सोडविण्याचे मॅनेजमेंटने मान्य केले आहे.

कॉन्ट्रॅक्ट लेबर व कन्टीजन कामगार हयांच्या वेतन करारावर व हॉस्पीटलमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या वेतन करारासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. हा वेतन करार लवकरात लवकर व्हावा म्हणून **ओएनजीसी (बीओपी) कर्मचारी संघटना, मुंबई** जोरदार आग्रही राहिली. व्यवस्थापनाने लवकरात लवकर वेतन करार करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

हे सर्व सकारात्मक बदल आपण **ओएनजीसी (बीओपी) कर्मचारी संघटनेला** भरघोस मतांनी निडून दिल्यामुळे करु शकलो आहोत. यानंतर सुध्दा असाच आपला भक्क्म पाठिंबा कर्मचारी संघटनेला मिळावा, ही नम्र विनंती.

"कर्मचारी संघटना झिंदाबाद"
"कामगार एकता झिंदाबाद"

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**